International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# माधव सरकुंडे यांच्या कथेची भाषाशैली (विशेष संदर्भ : 'सर्वा' व 'ताडमं' कथासंग्रह.)

श्री. चेपूरवार गंगाधर नरसिंगराव
पीएच.डी. संशोधक - पीपल्स कॉलेज नांदेड
*Corresponding Author*- श्री. चेपूरवार गंगाधर नरसिंगराव
ईमेल :- chepurwargn27@gmail.com

**प्रास्ताविक :-**

भाषा हे मानवी अभिव्यक्तीचे महत्त्वाचे साधन आहे. भाषेच्या माध्यमातूनच मानवाचे जीवन अभिव्यक्त होते. साहित्याचा अविभाज्य घटक म्हणून भाषेकडे पाहिले जाते. कारण, साहित्यिक आपल्या भाषिक वैशिष्ट्यातूनच साहित्य निर्मिती करून ते वाचकांसमोर समीक्षा करण्यास ठेवतात. एकुणच लेखक हा आपल्या साहित्य लेखनात परिणामकारक आशय प्रकट करण्यासाठी भाषेचा समर्पकपणे वापर करत असतो. म्हणजे साहित्यकृतीत भाषाशैली हा घटक महत्त्वाचा असतो. माधव सरकुंडे यांच्या कथात्म साहित्यातील भाषाशैली याविषयी चा अभ्यास खालीलप्रमाणे करता येईल.

**सर्वा (कथासंग्रह) :-**

माधव सरकुंडे यांचा 'सर्वा' हा पहिला कथासंग्रह आहे. हा कथासंग्रह १४ एप्रिल २००० मध्ये देवयानी प्रकाशन, यवतमाळ द्वारा प्रकाशित करण्यात आला. माधव सरकुंडे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत या कथा लिहिल्या आहेत. आदिवासीच्या जीवनातील दुःख, कष्ट, ग्रामीण आदिवासी राजकारण, दारिद्रय, व्यथा, निरक्षरता, शोषण, अंधश्रद्धा, सामाजिक प्रश्न, सामाजिक बांधिलकी, ग्रामीण आदिवासी माणसाची संवेदनशीलता, यासारखे विषय त्यांनी जीवंतपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या कथासंग्रहामध्ये एकुण दहा कथा आहेत.

**(ताडमं (कथासंग्रह) :-** माधव सरकुंडे यांचा 'ताडमं' हा दुसरा कथासंग्रह आहे. हा कथासंग्रह सन. २००१ मध्ये साकेत प्रकाशन, औरंगाबाद द्वारे प्रकाशित करण्यात आला. माधव सरकुंडे यांनी वऱ्हाडी बोलीत या कथा लिहिल्या आहेत. 'ताडमं' हा कथासंग्रह म्हणजे व्यथांचा संग्रह आहे. 'ताडमं' या कथासंग्रहात आदिवासीच्या जीवनातील दाहकता, व ग्रामीण समाजाशी संबध आलेल्या व्यावहारिक जीवनात आदिवासींची उपेक्षा कथाकार माधव सरकुंडे यांच्या लेखणीतून प्रतिबिंबित झालेली दिसते. 'ताडमं' या कथासंग्रहामध्ये एकुण नऊ कथा आहेत.

**माधव सरकुंडे यांच्या कथेची भाषिक वैशिष्ट्ये :-** वऱ्हाड मातीत जन्मलेले कथाकार माधव सरकुंडे यांचे वऱ्हाडी मातीशी, भाषेशी माय लेकराचे नाते आहे. ते वऱ्हाडात लहानाचे मोठे झाले. मातृभाषा म्हणूनही त्यांची भाषा वऱ्हाडी त्यामुळे कथा लिहिताना वऱ्हाडी बोली भाषेमध्ये कुठेही कृत्रिमता आढळत नाही. तर अस्सल वऱ्हाडी बोलीभाषेचा बाज वाचकांना वाचावयास मिळतो. 'सर्वा' व 'ताडमं' या दोन कथासंग्रहातील वऱ्हाडी बोलीभाषेचा वापर हे कथाकार माधव सरकुंडे यांच्या कथेचे महत्त्वाचे वैशिष्टये सांगता येईल. माधव सरकुंडे यांच्या 'सर्वा' व 'ताडमं' या कथासंग्रहामधील बोलीभाषा ही यवतमाळ जिल्ह्याच्या आजुबाजुच्या परिसरातील बोलीभाषा आहे. वऱ्हाडी बोलीभाषेमुळे कथा वाचनीय ठरतात. माधव सरकुंडे यांच्या 'सर्वा' व 'ताडमं' या कथासंग्रहामध्ये म्हणी, वाक् प्रचार, वऱ्हाडी शब्द, प्रतीके, प्रतिमा, रूपके, उपमा, वऱ्हाडी संवाद, प्रभावी निवेदनशैली आदीचा समर्थपणे वापर माधव सरकुंडे यांनी केला आहे. माधव सरकुंडे यांच्या 'सर्वा' व 'ताडमं' या कथासंग्रहामध्ये खालील दोन पध्दतीचा अवलंब केलेला दिसतो, (अ). प्रथमपुरूषी निवेदन (ब). तृतीय पुरूषी निवेदन.

**'सर्वा' मधील भाषाशैली :-** माधव सरकुंडे 'सर्वा' या आपल्या कथासंग्रहामध्ये कथा लेखनासाठी काही कथामध्ये प्रथमपुरूषी निवेदन तर काही कथामध्ये तृतीय पुरूषी निवेदन पध्दतीचा वापर करतात. आपल्या निवेदनाद्वारे ते ग्रामीण आदिवासी भागातील जीवंत चित्र उभे करतात. त्याचप्रमाणे ग्रामीण आदिवासी भागातील राजकारणाचाही जिवंत प्रत्यय देतात. उपहासात्मकता हे त्यांच्या लेखनशैलीचे महत्त्वाचे वैशिष्टये आहे. आपल्या लेखनातील उपहासात्मक शैलीतून ते समाजातील स्वार्थी व भ्रष्ट प्रवृत्तीचा जसा

समाचार घेतात. त्याचप्रमाणे काही व्यक्तींच्या कटकारस्थानी वृत्तीचाही समाचार घेतात. संवादात्मकता हे देखील त्यांच्या लेखनशैलीचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. माधव सरकुंडे यांच्या कथामध्ये अनेक प्रकारचे संवाद आलेले दिसतात. त्यातील संवादातून ग्रामीण आदिवासी भागातील अनेकविध संघर्षमय, जिवंत व नाट्यमय प्रसंग उभे केलेले दिसतात. वेगवेगळया प्रसंगी आदिवासी पुढारी यांनी केलेले भाषण, व्यथा, अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा विरूध्द जाणीव जागृती, शिक्षणाचे महत्त्व, दळणवळण, सोवी सुविधा, परिवर्तनाचे जीवंत प्रसंग देखील लेखकाने अनेक ठिकाणी आवश्यकतेनुसार नोंदविले दिसतात. वऱ्हाडी बोलीचा वापर हे देखील त्यांच्या लेखनशैलीचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. ते निवेदनासाठी प्रमाणभाषेबरोबरच वऱ्हाडी बोली भाषेचा वापर करतात. ग्रामीण आदिवासी भागातील वेगवेगळया व्यक्तीच्या तोंडी मात्र अस्सल अशी वऱ्हाडी बोलीभाषा दिसून येते. बोलीभाषेच्या या प्रभावी वापरामुळे ग्रामीण आदिवासी जीवन अनुभवाचा जिवंत प्रत्यय येतो. अलंकारिक भाषेचा उपयोग न करता त्यांनी बोलीभाषेचा वापर केलेला आहे. माधव सरकुंडे यांनी आपल्या 'सर्वा' या कथासंग्रहामधून म्हणी, वाक् प्रचार, प्रतिमा, प्रतिके, रूपके आदीचा प्रभावी वापर केलेला दिसून येतो. तसेच 'सर्वा' या कथासंग्रहामध्ये आलेली वाक्यरचना, हिंदी व इंग्रजी भाषेतील शब्द, प्रभावी संवाद यामुळे 'सर्वा' या कथासंग्रहाची भाषाशैली प्रत्ययकारी बनली आहे. 'सर्वा' या कथेमध्ये माधव सरकुंडे यांनी तृतीयपुरूषी निवेदन पध्दतीचा अवलंब केलेला आहे. या निवेदनातून सटवी च्या मनात चाललेली तगमग जीवंतपणे चित्रित करताना ते लिहितात, "सुतकी चेहरे घेऊन तिघं मायलेक घरी आले. त्यारात्री तिघांनी अन्नाचा घास घेतला नाही. जवळचा नातलग गेल्यागत त्यांना दुःख झाले होते. सटवीला रातभर झोप लागली नाही. ती या अडंगावरुन त्या अडंगावर कलथत राहीली. आता पोराच्या शाळेच कसं ? हा एकच प्रश्न तिच्या मनात घोळत होता. आपली वणवण तर जन्मभर सुरूच राहणार. परंतु पोराच्या आयुष्यात अशी पायपीट येऊ नये. आमच्या अडाणीपणामुळ आम्ही घरात अन् दारात लुटल्या गेलो. पोराचे तरी तसे होऊ नये, या चेंद्री चेंद्रीत सटवीची रात्र गेली".

**'ताडमं' मधील भाषाशैली :-** माधव सरकुंडे 'ताडमं' या आपल्या कथासंग्रहामध्ये कथा लेखनासाठी काही कथामध्ये प्रथमपुरूषी निवेदन तर काही कथामध्ये तृतीय पुरूषी निवेदन पध्दतीचा वापर करतात. आपल्या निवेदनाद्वारे ते आदिवासी भागातील जिवंत चित्र उभे करतात. ते निवेदनासाठी प्रमाणभाषेबरोबरच वऱ्हाडी बोली भाषेचा वापर करतात. तसेच म्हणी, वाक् प्रचार, प्रतिमा, प्रतिके, रूपके आदीचा वापर केलेला दिसून येतो. 'ताडमं' कथासंग्रहामध्ये आलेली वाक्यरचना, हिंदी व इंग्रजी भाषेतील शब्द, वाक्य, संवाद रचना यामुळे 'ताडमं' कथासंग्रहाची भाषाशैली प्रत्ययकारी बनली आहे. 'ताडमं' या कथेमध्ये माधव सरकुंडे यांनी तृतीयपुरूषी निवेदन पध्दतीचा अवलंब केलेला आहे. या निवेदनातून उंकड्याच्या मनात चाललेली तगमग व दत्याविषयीची चिंता उंकड्याला स्वस्थ बसू देत नाही. हे चित्रीत करताना माधव सरकुंडे लिहितात, "चखोट जेवन येळ ढळून गेली तरी दत्या घरी आला नाय म्हुन त्यांच्या बापाच्या जीवाला घोर लागला व्हता, आखरी वाट फावून -फावून त्यांच्या बापानं काठी उचली न् वढ्याच्या रस्ता धरला. काठी टेकवत -टेकवत त्यानं वढा गाठला. उंकड्या वढ्यावं आल्यावं त्याला संमदीक सामसुम दिसलं. तव्हा त्याचा पोटात चर्रकन रेघ वढली. त्यांच्या अंगाचा थरकाप झाला".

**समारोप :-**

माधव सरकुंडे यांच्या 'सर्वा' व 'ताडमं' या कथासंग्रहातील भाषिक वैशिष्ट्याचा अभ्यास करत असताना, त्यांनी काही कथामध्ये तृतीय पुरूषी निवेदन पध्दतीचा तर काही कथामध्ये प्रथमपुरूषी निवेदन पध्दतीचा वापर केलेला आढळतो.

त्यांनी आपल्या परिसरातील समाजजीवनात व्यावहारीकदृष्टया जी भाषा बोलली जाते त्या वऱ्हाडी बोली भाषेचा, त्यातील वैशिष्ट्येपूर्ण लकबींचा, प्रचलित म्हणी व वाक् प्रचाराचा नेमकेपणाने वापर करून, लेखनशैलीमुळे जीवनानुभव प्रत्ययकारी बनतात. तसेच निवेदन पध्दतीत संवादात्मक प्रतिमा व प्रतिके, म्हणी व वाक् प्रचारा बरोबरच हिंदी व इंग्रजी शब्दांचाही आपल्या लेखनात प्रभावीपणे वापर केलेला दिसतो.

**संदर्भग्रंथ :-**

(१).माधव सरकुंडे, सर्वा, देवयानी प्रकाशन, यवतमाळ, १४ एप्रिल २०००.

(२). माधव सरकुंडे, ताडमं, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, २००१.